


दैनिक
निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com    RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे    अंक : ३७२ वा    शनिवार दि २३ मे २०२६    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये

# आमचे ३३३ चे बळ, लावा ताकद! स्थानिक आघाड्यांची रसद, पुण्याच्या जागेवर भाजपचा फायनल दावा! राष्ट्रवादीवर दबाव वाढला

**पुणे**

पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीपूर्वी महायुतीतील जागावाटपाचा तिढा अधिकच गडद होताना दिसत आहे. भारतीय जनता पक्षाने केवळ स्वतःच्या संख्याबळावर नव्हे, तर जिल्ह्यातील स्थानिक आघाड्यांचीही साथ जोडत पुण्याच्या जागेवर थेट दावा ठोकला आहे. पुणे महापालिकेचे सभागृह नेते गणेश बीडकर यांनी भाजप आणि मित्र आघाड्यांकडे मिळून तब्बल ३३३ मतांची ताकद असल्याचा दावा करत पुण्याची जागा भाजपला मिळावी, अशी थेट मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. भाजपच्या स्थानिक नेत्यांची नुकतीच एक बैठक पार पडली असून त्यात पुण्याची जागा ही भाजपनेच लढवावी असा सूर आवळण्यात आला आहे. बीडकर यांनी मांडलेल्या नव्या राजकीय गणितानुसार, पुणे जिल्ह्यात भाजप सर्वात मोठा पक्ष ठरत असल्याचा दावा करण्यात येत आहे. भाजपचे जिल्हाभरात एकूण ३०९ सदस्य निवडून आलेले आहेत. त्यात आता दोन प्रभावी स्थानिक आघाड्यांची भर पडली आहे. इंदापूरमधील ङ्गकृष्णा भीमा विकास आघाडीफ्चे ७ सदस्य तसेच दौंडमधील ङ्गनागरिक हित संरक्षण मंडळ विकास आघाडीफ्चे १७ सदस्य. या दोन्ही आघाड्यांची २४ मते आणि भाजपची ३०९ मते मिळून एकूण ३३३ मतांची भक्कम ताकद भाजपकडे असल्याचा दावा करण्यात येत आहे. या ङ्ग३३३फ्च्या आकड्यावरूनच पुणे स्थानिक स्वराज्य संस्थेची जागा भाजपलाच मिळाली पाहिजे, असा सूर पक्षातील स्थानिक नेत्यांकडून उमटत आहे. पुणे जिल्हा हा परंपरेने राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभावक्षेत्र मानला जातो. मात्र बदललेल्या राजकीय समीकरणांमध्ये अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस गटाकडे सध्या २९८ सदस्य असल्याचे भाजपकडून सांगितले जात आहे. भाजपचे स्वतःचे ३०९ सदस्य हे ङ्गराष्ट्रवादीफ्पेक्षा अधिक आहेत. त्यात स्थानिक आघाड्यांची २४ मतांची भर पडल्यामुळे भाजपने तब्बल ३५ मतांची आघाडी घेतल्याचा दावा करण्यात आला आहे. यामुळे महायुतीतील जागावाटपात पुण्याची जागा भाजपनेच लढवावी, यासाठी पक्षाने जोरदार लॉबिंग सुरू केल्याचे चित्र आहे



पुणे महापालिकेत भाजपची ताकद हेच बीडकर यांच्या दाव्याचे मुख्य आधारस्थान मानले जात आहे. महापालिकेतील १६५ सदस्यांपैकी तब्बल ११९ सदस्य भाजपचे आहेत. त्या तुलनेत अजित पवार गटाकडे केवळ २७ सदस्य असल्याचे सांगितले जात आहे. शहरातील या वर्चस्वामुळे आणि जिल्ह्यातील ३३३ मतांच्या एकत्रित ताकदीमुळे पुण्याची जागा अखेरीस भाजपलाच मिळेल, असा विश्वास भाजप नेत्यांकडून व्यक्त केला जात आहे. दरम्यान, गणेश बीडकर स्वतः इच्छुक असल्याने त्यांनी स्थानिक पातळीवर मोर्चेबांधणी आणखी तीव्र केली आहे. ङ्ग३३३फ्चा आकडा पुढे करत भाजपने आता राजकीय दबाव वाढवला असून, ही जागा मित्रपक्षाला दिल्यास कार्यकर्त्यांमध्ये चुकीचा संदेश जाईल, अशीही भीती स्थानिक नेतृत्वातून व्यक्त होत आहे. त्यामुळे आता भाजपच्या या ङ्ग३३३ च्या चक्रव्यूहाफ्तून अजित पवार गट स्वतःसाठी जागा कशी मिळवतो आणि महायुतीचे वरिष्ठ नेते हा तिढा कसा सोडवतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

---

# सुनेत्रा पवारांच्या राजीनाम्याने रिक्त, राज्यसभेच्या जागेसाठी राष्ट्रवादीची शॉर्टलिस्ट, महाराष्ट्रातील मंत्र्याचं नाव चर्चेत

**मुंबई**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या राजीनाम्याने रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेसाठी येत्या १८ जून रोजी पोटनिवडणूक होणार आहे. ही पोटनिवडणूक बिनविरोध होण्याची दाट शक्यता असून, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून या जागेसाठी अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ , प्रमोद हिंदुराव आणि अविनाश आदिक यांच्या उमेदवारीची चर्चा आहे. सुनेत्रा पवारांच्या राजीनाम्याने रिक्त बारामती मतदारसंघाच्या विधानसभा पोटनिवडणुकीत विधानसभेवर निवडून आल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी ६ मे २०२६ रोजी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे रिक्त झालेल्या या जागेसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने शुक्रवारी पोटनिवडणूक घोषित केली. घोषित कार्यक्रमानुसार पोटनिवडणुकीची अधिसूचना १ जून रोजी जारी केली जाईल. बारामती मतदारसंघाच्या विधानसभा पोटनिवडणुकीत विधानसभेवर निवडून आल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी ६ मे २०२६ रोजी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे रिक्त झालेल्या या जागेसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने शुक्रवारी पोटनिवडणूक घोषित केली. घोषित कार्यक्रमानुसार पोटनिवडणुकीची अधिसूचना १ जून रोजी जारी केली जाईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस ८ जून आहे. उमेदवारी अर्जाची छाननी ९ जूनला होईल. अर्ज माघारीची मुदत ११ जून असून, आवश्यकता भासल्यास १८ जूनला मतदान होऊन त्याच दिवशी मतमोजणी होईल. दहा राज्यांतील राज्यसभेच्या २४ जागांसाठी द्विवार्षिक निवडणुकीचे वेळापत्रक शुक्रवारी जाहीर करण्यात आले. त्यानुसार १८ जून रोजी मतदान होणार असून, त्याच दिवशी मतमोजणी होणार आहे. वरिष्ठ सभागृहात पुन्हा निवडून येतील अशा नेत्यांत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, केंद्रीय मंत्री रवनीतसिंग बिट्टू यांचा समावेश आहे. या निवडणुकीनंतर सत्तारूढ भाजप आघाडीचे राज्यसभेतील बळ जैसे थे राहणार असून काँग्रेसला तमिळनाडूच्या मार्गे आपल्या चार जागांत एकाची बेरीज करणे शक्य होणार आहे. यामुळे प्रमुख विरोधी पक्षाचे राज्यसभेतील संख्याबळ ३०च्या पुढे जाईल. यावेळी कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि गुजरातमधून राज्यसभेच्या प्रत्येकी चार जागा रिक्त होत आहेत. राजस्थान आणि मध्य प्रदेशमध्ये प्रत्येकी तीन, मणिपूर, मेघालय, अरुणाचल प्रदेश, झारखंड आणि तमिळनाडूत प्रत्येकी एका जागेसाठी पोटनिवडणूक होईल. विधान परिषद आणि राज्यसभा पोटनिवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडीतील इच्छुकांची मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. राष्ट्रवादीमधील इच्छुकांनी भेटीगाठींचा जोर वाढविला असल्याची माहिती समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून या निवडणुकीसाठी माजी आमदार अमोल मिटकरी, अनिकेत तटकरे, सुनील टिंगरे आणि दीपक मानकर यांच्या नावाची चर्चा आहे.



# प्रशासक नियुक्तीचं राजकारण!

कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळची स्थापना ६३ वर्षांपूर्वी झाली. गेल्या काही वर्षांत राज्यातील अनेक जिल्हा दूध संघांना कुलूप लागले. अनेक संघ डबघाईला आले, पण गोकुळ मात्र प्रगतीच्या शिखरावर पोहोचला. चार हजार कोटींची वार्षिक उलाढाल असलेल्या या संघातील अर्थकारण थक्क करणारे आहे. यामुळेच ङ्गमला एक वेळ आमदारकी नको, पण गोकुळचे संचालक पद द्या,फ अशी मागणी सातत्याने होत होती. आनंदराव पाटील- चुयेकर यांनी याची स्थापना केली. त्यानंतर तब्बल २५ वर्षे त्याच्यावर माजी आमदार महादेवराव महाडिक यांची सत्ता होती. पाच वर्षांपूर्वी आमदार सतेज पाटील यांनी त्याला सुरुंग लावला. त्यांना मंत्री हसन मुश्रीफ आणि आमदार विनय कोरे यांनी साथ दिली. साडेचार वर्षे सारं काही व्यवस्थित सुरू होते. संघावर सर्वपक्षीय सत्ता होती, सहा महिन्यांपूर्वी नाविद मुश्रीफ चेअरमन झाले आणि संघावर महायुतीची सत्ता आली. एकीकडे महायुतीची सत्ता आहे, असं म्हणत असताना सत्तेची सूत्रं मात्र, महाविकास आघाडीचे आमदार सतेज पाटील आणि मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हातात होती. याचा राग महाडिक गटाला निश्चितपणे होता. कारण या गटाला सत्तेपासून दूर ठेवण्यात आलं होतं. संघाच्या संचालकांची मुदत संपत आली तेव्हा बिनविरोधच्या हालचाली सुरू झाल्या. अनेक संचालक विविध नेत्यांना भेटले, पण महाडिक गटाला टाळले. माजी आमदार महाडिक, खासदार धनंजय महाडिक आणि आमदार अमल महाडिक यांना डावलण्याचाच हा प्रयत्न होता. याशिवाय बिनविरोधच्या प्रस्तावावर चर्चा करत असताना भाजपला कमी जागा आणि इतर पक्षांना जादा असाही फॉर्म्युला चर्चेत आला. जो भाजपला मान्य नव्हता. यामुळे हे सारे प्रकरण पोहोचले ते थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत. पश्चिम महाराष्ट्रातील सहकारातील प्रमुख संस्था भाजपच्या ताब्यात असावी असं वाटणं साहजिक आहे. त्याच धर्तीवर सहा महिन्यांपूर्वी



आमदार सतेज पाटील गटाला बाजूला ठेवत जेव्हा नाविद मुश्रीफ यांचे नाव चेअरमन म्हणून पुढे आले, त्याचवेळी गोकुळच्या सत्तेच्या किल्ल्या भाजपने आपल्या ताब्यात ठेवल्या. म्हणजे चेअरमन राष्ट्रवादीचा पण कारभार भाजपच्या हातात राहावा यासाठीच या हालचाली होत्या, पण तेव्हा हा डाव इतरांच्या लक्षात आला नाही. काही दिवसांत भाजपने आपले पत्ते खोलले. ताकद कमी असतानाही ङ्गसत्तेचा समान वाटाफ हा प्रस्ताव पुढे आणला, जो राष्ट्रवादी आणि शिवसेनेने नाकारला. त्याचे पडसाद पुढे उमटत गेले. गोकुळफ आपल्याच ताब्यात राहावा, यासाठी मंत्री मुश्रीफ यांचे प्रयत्न सुरू झाले. दुसरीकडे सतेज पाटील यांचा दोस्ताना कायम ठेवला. हीच बाब महाडिक गटाला खटकत होती. त्यामुळे संधीची वाटच महाडिक गट बघत होता. यातूनच हळूहळू अदृश्य शक्ती कार्यरत झाली. कोल्हापुरात खासदार धनंजय महाडिक आणि मुंबईत थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच विविध माध्यमांतून हा संघ आपल्या ताब्यात घेण्यासाठी कार्यरत झाले. त्याचाच एक भाग म्हणून आमदार शिवाजी पाटील यांनी थेट मंत्री मुश्रीफ यांच्यावर आरोप करायला सुरुवात केली. जिल्हा परिषद निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी एक होऊन पाटील यांचा धुव्वा उडवला होता. तो राग त्यांच्या मनात होताच. शिवाय राष्ट्रवादीचा फटका आमदार विनय कोरे यांच्या जनसुराज्य शक्ती पक्षाला बसला होता. त्यामुळे भाजप आणि जनसुराज्यने मुश्रीफ यांना कोंडीत पडकण्यासाठी फासे टाकले. दुसरीकडे प्रकाश बेलवाडे या कार्यकर्त्याला ताकद देण्यात आली. बेलवाडे यांनी मुश्रीफ यांच्यावर तोफ डागत असतानाच त्यांच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी बाहेर थेट आरोप आणि दुसरीकडे न्यायालयाचा रस्ता धरला, ज्यातून सत्ताधारी संचालक हळूहळू अडचणीत येऊ लागले. नियमबाह्य कामकाजामुळे सर्वच संचालकांना अपात्र करावे म्हणून बेलवाडेंनी न्यायालयात याचिका दाखल केली. पाच वर्षांच्या सत्ता काळात सत्ताधारी संचालकांनी साधारणतः बाराशेपेक्षा अधिक नवीन दूध संस्था स्थापन करत नोंदणी केली. हे करत असताना काही नियम डावलण्यात आले. यातील बऱ्याच संस्था बोगस असल्याने तत्कालीन दुग्धविकास खात्याचे अधिकारी तुकाराम मुंडे यांनी त्यांच्यावर अवसहाय्यक नियुक्ती केली. या सर्वांना मतदानाचा अधिकारच देऊ नये म्हणून एकीकडे न्यायालयीन पातळीवर लढाई सुरू झाली. दुसरीकडे त्यांची सुनावणी घ्या आणि मतदानाचा अधिकार द्या म्हणून याचिका दाखल झाल्या. या याचिका दाखल करत असताना निवडणुका पुढे जाव्यात हा मूळ हेतू होता. भाजपचा हा हेतू साध्य झाला. ङ्गगोकुळफवर प्रशासक येऊ नये म्हणून विद्यमान संचालक तसेच राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या नेत्यांनी प्रचंड प्रयत्न केले. त्यासाठी थेट सर्वोच्च न्यायालयापर्यंत धाव घेतली. शिवाय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मध्यस्थी घालत मुख्यमंत्र्यांनाही विनंती करण्यात आली. पण, प्रशासक आणून ङ्गगोकुळफ आपल्या ताब्यात घेण्याचा भाजपचा डाव होता, तो अखेर यशस्वी झालाच. याला कारणीभूत ठरला गेल्या पाच-सहा महिन्यांतील मंत्री मुश्रीफ यांचा कारभार. त्यांनी महाडिक गटाला डावलण्याचा प्रयत्न केला, याशिवाय गेल्या पाच वर्षांत महाडिक गटाला त्रास देण्याचाही प्रयत्न झाला. बदल्या असू दे किंवा त्यांच्या काळातील काही प्रकरणे उघडकीस आणण्याचे प्रयत्न, या सगळ्यांमुळे महाडिक गट दुखावला होताच. जिल्ह्यात आता महाडिक गटाची ही ताकद भाजप म्हणून आहे. यामुळे महाडिक गटाने वेळ येताच भाजपच्या खांद्यावर बंदूक ठेवली आणि थेट शिकार केली ती मंत्री मुश्रीफ यांचीच. यातून हतबल झालेल्या मुश्रीफांनी बरेच प्रयत्न केले, पण त्यामध्ये यश आले नाही.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# ‘नरेंद्र मोदींना विचारण्यात आलेला प्रश्न व्हायरल होण्यासाठीच होता का?’ हेले लेंग यांचं उत्तर काय?

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदींना नॉर्वेमध्ये एका महिला पत्रकाराने प्रश्न विचारला होता. त्यानंतर तिच्या अडचणी वाढल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या युरोप दौऱ्यावर असून युरोपातील विविध देशांना भेटी देत आहेत. नॉर्वेतील भेटीदरम्यान नॉर्वेचे पंतप्रधान जोनस स्टोर यांच्याबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत नॉर्वेच्या पत्रकार हेले लेंग स्वेन्सेन यांनी भारतीय प्रेस स्वातंत्र्याबद्दल प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला. ज्यानंतर तिचं फेसबुक अकाऊंट २४ तासांसाठी बंद करण्यात आलं होतं. आता हा प्रश्न व्हायरल होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींना ठरवून विचारला होतास का? याबाबत पत्रकार हेले लेंग स्वेन्सेनने उत्तर दिलं आहे.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विचारलेला प्रश्न हा व्हायरल होण्यासाठी विचारला होता का? असं विचारलं असता पत्रकार हेले लेंगने सांगितलं की मी पेशाने पत्रकार आहे. मला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. मी माझं काम करत होते. बाकी काहीच नाही. प्रश्न उपस्थित करणं ही माझी जबाबदारी आहे, मी त्याच उद्देशातून हे केलं होतं. मला हे मान्य आहे की मी तो मुद्दा नॉर्वेच्या परराष्ट्र मंत्रालयासमोर ठेवला नव्हता, मला तिथे तो प्रश्न सुचला आणि मी तो विचारला असं त्यांनी सांगितलं. हेले लेंग यांनी एनडीटीव्हीला दिलेल्या मुलाखतीत हे उत्तर दिलं आहे. तसंच लेंग यांना विचारण्यात आलं की तुम्हाला हे ठाऊक होतं का की ती एक मुक्त पत्रकार परिषद नव्हती. त्यावर लेंग यांनी सांगितलं की मला हे माहीत होतं की मला भविष्यात मोदींना प्रश्न विचारण्याची संधी मिळणार नाही. त्यामुळे मी त्या क्षणी प्रश्न विचारला.

या मुलाखतीत लेंग यांना विचारण्यात आलं की राहुल गांधींची मुलाखत घेण्याची माझी इच्छा आहे. मी त्यासाठी त्यांना संपर्क केला आहे. जर मला राहुल गांधींची मुलाखत घेण्याची संधी मिळाली तर मी त्यांची मुलाखत नक्की घेईन. त्याचप्रमाणे भारतातील मानवाधिकार आणि माध्यमांचं स्वातंत्र्य याबाबतच्या मुद्द्यांवरही त्यांना प्रश्न विचारेन.





## मोदींच्या व्यंगचित्राबाबत काय म्हणाल्या हेले लेंग?

■ नॉर्वेच्या वृत्तपत्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना गारुड्याच्या रुपात दाखवत व्यंगचित्र छापण्यात आलं. याबाबत प्रश्न विचारला असता लेंग यांनी मौन बाळगलं आहे. मी तो लेख वाचलेला नाही. त्यामुळे असं व्यंगचित्र का वापरण्यात आलं हे मला सांगता येणार नाही. त्या व्यंगचित्रामुळे लोकांच्या भावना दुखावल्या असतील तर त्यावर चर्चा झाली पाहिजे असं लेंग यांनी सांगितलं. भारताच्या लोकशाहीबाबत तुम्हाला काय ठाऊक आहे हे विचारलं असता मी भारतात कधीही कव्हरेज केलेलं नाही किंवा रिपोर्टर म्हणून काम केलेलं नाही. मात्र भारतात प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रांमध्ये माहिती वाचली आहे. मला भारताच्या राजकारणापेक्षा तिथली संस्कृती तिथले खाद्यपदार्थ हे जास्त आवडतात असंही लेंग यांनी सांगितलं.

# राष्ट्रवादीच्या दोन नगरसेवकांचा भाजप प्रवेश

■ सांगली/वृत्तसंस्था

सांगली महापालिकेतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे दोन नगरसेवक भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. पक्ष प्रवेशाबाबत त्यांनी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याशी जनसुराज्य शयती पक्षाचे प्रदेशाध्यक्ष समित कदम यांच्या साक्षीने चर्चा केल्यानंतर त्यांनी भाजप प्रवेशाचा निर्णय घेतला आहे.

सांगली महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तीन नगरसेवक आहेत. महापालिकेतील पक्ष प्रतोद युवराज गायकवाड आणि सुरेश बंडगर यांनी काल रात्री पालकमंत्री पाटील यांच्याशी चर्चा केली. यानंतर त्यांनी पक्ष प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. या चर्चेदरम्यान, जनसुराज्यचे श्री. कदम हेही उपस्थित होते. आज सायंकाळी पक्ष प्रवेश मुंबईत प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत होणार असून यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही भेट घेणार असल्याचे श्री. गायकवाड यांनी सांगितले. याबाबत गायकवाड यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले, केवळ विरोधासाठी विरोध करण्याची वृत्ती ठेवली



तर प्रभागातील नागरिकांना कामे करण्याची दिलेली आश्वासने पूर्ण करता येणार नाहीत. प्रभागातील विकास कामांना गती मिळावी यासाठी आपण भाजप प्रवेशाचा निर्णय घेतला असून भाजपच्या ध्येयधोरणाला अनुसरून आपण यापुढे कार्यरत राहणार आहे. या तीन नगरसेवकांचा स्वतंत्र गट असून महापालिकेत महाविकास आघाडी म्हणून हा पक्ष कार्यरत आहे. तीन नगरसेवकांपैकी दोघांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने आता महापालिकेत राष्ट्रवादीचे संख्याबळ केवळ एकच उरले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था गटातील निवडणूक जाहीर झालेली असताना नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याने हा आमदार पाटील यांना राजकीय धक्का मानला जात आहे.

# राज्यातील महिलांसाठी आता जिल्हास्तरावर ‘पीसीओडी क्लिनिक’; महिलांना स्त्रीरोग तज्ज्ञांकडून तपासणी ते एकात्मिक पद्धतीने उपचार

■ परभणी/वृत्तसंस्था

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यभर “पॉलीसिस्टिक ओव्हेरियन डिसीज (पीसीओडी) क्लिनिक” सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.महिलांमध्ये वाढत्या प्रमाणात आढळणाऱ्या ‘पीसीओडी’ समस्येवर वेळेत निदान, उपचार आणि समुपदेशन उपलब्ध करून देण्यासाठी ही नवीन विशेष उपक्रम सुरू करण्यात आला आहे. आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी ही माहिती दिली.

राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांनी यासंदर्भात सर्व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांना आदेश जारी केले आहेत. या निर्णयामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील महिलांना तज्ज्ञ उपचार आणि मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.

‘पीसीओडी’ ही महिलांमध्ये आढळणारी हार्मोनल समस्या असून त्याचा परिणाम



मासिक पाळीतील अनियमितता, वजन वाढ, वंध्यत्व, मानसिक ताण, त्वचेच्या समस्या तसेच इतर आरोग्यविषयक गुंतागुंतांवर होत असतो. विशेषतः किशोरवयीन व प्रजननक्षम वयोगटातील महिलांमध्ये या समस्येचे प्रमाण वाढत असल्याने राज्य शासनाने यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. शासनाच्या आदेशानुसार दिनांक ६ मे पासून राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालये, सामान्य रुग्णालये, स्त्री रुग्णालये, १०० खाटांची उपजिल्हा रुग्णालये तसेच महानगरपालिका रुग्णालयांमध्ये पीसीओडी क्लिनिक सुरू करण्यात आली आहेत. हे क्लिनिक दर बुधवारी ‘मेनोपॉज ओपीडी’ सोबत चालविण्यात येतील. या क्लिनिकमध्ये महिलांना स्त्रीरोग तज्ज्ञांकडून तपासणी, आवश्यक वैद्यकीय तपासण्या, एकात्मिक पद्धतीने उपचार, आरोग्यविषयक समुपदेशन,आहार व जीवनशैली संदर्भातील मार्गदर्शन या सुविधा दिल्या जाणार आहेत.


ज्या रुग्णालयांमध्ये नियमित स्त्रीरोग तज्ज्ञ उपलब्ध नसतील, त्या ठिकाणी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नियुक्त स्त्रीरोग तज्ज्ञांची सेवा घेण्यात येणार आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृतीसाठी उपसंचालक, आरोग्य सेवा तसेच आयईसी विभाग यांच्यामार्फत विशेष समन्वय साधण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यातील लाभार्थी महिलांची माहिती, तपासणी, निदान व उपचार यांचा नियमित अहवाल शासनाकडे सादर करण्यात येणार आहे.

# “तुमची मेलडी रील हा भारतीयाचा अपमान”; रीलवर राहुल गांधींची टीका

■ हेग/वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या इटलीच्या दौऱ्यावर आहेत. मोदींनी इटलीत पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांची भेट घेतली. या भेटीत मोदींनी मेलोनी यांना मेलडी चॉकलेट भेट दिली. या भेटीची रील सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. पण, विरोधकांकडून या रीलवर जोरदार टीकाही केली जात आहे. “पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जॉर्जिया मेलोनी यांच्याबरोबर केलेली रील हा भारतीय नागरिकांचा अपमान आहे”, अशा शब्दात राहुल गांधींनी नरेंद्र मोदींवर टीका केली आहे.

मंगळवारी पंतप्रधान मोदी इटलीमध्ये दाखल झाले असून इटलीत त्यांचं जंगी स्वागत करण्यात आलं आहे. जॉर्जिया मेलोनी यांनी




मोदी यांचं स्वागत करत त्यांच्या सोशल मीडिया अकाउंटवरून मोदींबरोबरचा एक सेल्फी शेअर केला. मेलोनी यांची ही पोस्ट मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली. त्यानंतर मेलोनी यांनी आणखी एक पोस्ट शेअर केली यात मोदी, मेलोनी यांना मेलडी चॉकलेट्सचा पुडा गिफ्ट दिल्याचं दिसत आहे. या व्हिडीओ देखील तुफान व्हायरल झाला. यावरुन राहुल गांधींनी नरेंद्र मोदींवर जोरदार टीका केली आहे. “भारतात आर्थिक वादळ येत आहे. तेल, पेट्रोल, डिझेल आणि विमानासाठी लागणाऱ्या इंधनाचे भाव गगनाला भिडतील. खतांची कमतरता भासू लागेल, खतांचे भाव वाढतील, शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे. अर्थव्यवस्थेला मोठा झटका बसणार आहे. पंतप्रधानांनी सांगितले की सोने खरेदी करु नका, अधिक प्रमाणात वाहन चालवू नका आणि विदेशात जाऊ नका. आणि नंतर विदेशात जाऊन, हजारो, कोट्यवधींच्या विमानातून विदेशात जाऊन तिथं इटलीच्या पंतप्रधान मेलोनींना मेलडी चॉकलेट खाऊ घालत आहेत. हा भारतीय जनतेचा अपमान आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी बनवलेली रील हा भारतीय नागरिकांचा अपमान आहे”, अशा शब्दात राहुल गांधींनी नरेंद्र मोदींवर टीका केली.

राहुल गांधींनी नरेंद्र मोदींच्या या कृतीला नौटंकी असल्याची टीका देखील सकाळी व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर केली. “देश आर्थिक संकटात आहे आणि पंतप्रधान मोदी इटलीत चॉकलेट्स वाटत आहेत. हे नेतृत्व नाही, तर नौटंकी आहे”, अशा शब्दांत राहुल गांधी यांनी हल्लाबोल केला आहे. “देश आर्थिक संकटात आहे आणि आपले पंतप्रधान इटलीमध्ये चॉकलेट्स वाटत आहेत. एकीकडे शेतकरी, तरुण, महिला, मजूर आणि छोटे व्यावसायिक आक्रोश करत आहेत. मात्र, दुसरीकडे पंतप्रधान मोदी हे हासत आहेत आणि रिल्स बनवत आहेत, त्यावर भाजपा टाळ्या वाजवत आहे. हे नेतृत्व नाही, तर नौटंकी आहे”, अशी टीका राहुल गांधी यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमधून केली आहे.

# अंत्यसंस्कार झाले, पण पाय राहिला रुग्णालयात; मेयोतील प्रकार, कुटुंबीयांची प्रशासनाकडे धाव

■ नागपूर/वृत्तसंस्था

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो) येथे एका ७२वर्षीय रुग्णावर शस्त्रक्रिया झाली. यात त्याचा पाय कापण्यात आला. त्यादरम्यान त्या रुग्णाचे निधन झाले. मात्र, कापलेला पाय धार्मिक विधीसाठी कुटुंबीयांना न देता त्याची विल्हेवाट लावण्यात आली. रुग्णाच्या कुटुंबीयांनी हा आरोप केला आहे. या प्रकरणामुळे नातेवाइकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.हमीद खान यांना गँगरिनच्या उपचारासाठी मेयो रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी त्यांच्या पायाची शस्त्रक्रिया करून तो कापणे आवश्यक असल्याचे सांगितले होते. त्यानुसार शस्त्रक्रिया पार पडली. वरिष्ठांची परवानगी घेऊन तीन ते चार दिवसांत पाय सुपूर्द केला जाईल, असे आश्वासन डॉक्टरांनी दिले होते, असे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. १८ मे रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजतादरम्यान शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र, त्याच रात्री हमीद खान यांचे उपचारादरम्यान निधन झाले. १९ मे रोजी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यानंतर अंत्यसंस्कार विधीदरम्यान कापलेला पाय परत मिळाला नसल्याची माहिती कुटुंबीयांनी दिल्यानंतर हा वाद समोर आला.मोमिनपुरा येथील नगरसेवक वसीम खान यांनी कुटुंबीयांसह मेयोचे अधिष्ठाता डॉ. रवी चव्हाण यांची भेट घेतली. चौकशीनंतर संबंधित अवयव शस्त्रक्रियेच्या दिवशीच भांडेवाडी येथे जैववैद्यकीय कचरा म्हणून विल्हेवाटीसाठी पाठवण्यात आल्याची माहिती देण्यात आली. डॉ. रवी चव्हाण यांनी सांगितले की, शस्त्रक्रियेनंतर संबंधित अवयव जैववैद्यकीय कचऱ्यात मोडतो आणि नियमांनुसार त्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावणे बंधनकारक असते. हा अपघातातील स्वच्छ 'कट' नसून गँगरिनसारखा संसर्गजन्य प्रकार होता. त्यामुळे नियमांनुसार तो अवयव कुटुंबीयांकडे सुपूर्द करता येत नाही. कुटुंबीयांच्या भावना लक्षात घेऊन काही पर्याय शोधण्याचा प्रयत्न झाला असण्याची शक्यता आहे. मात्र, कुटुंबीय चार दिवसांनी आले. त्यानंतर तो अवयव परत मिळवणे शक्य नव्हते, असे डॉ. चव्हाण यांनी स्पष्ट केले. तसेच, 'वेळेत माझ्याकडे आले असते तर कुटुंबीयांच्या भावना लक्षात घेऊन काही मार्ग काढता आला असता', असेही त्यांनी स्पष्ट केले.या प्रकाराला रुग्णालय प्रशासन आणि संबंधित डॉक्टरांचा गंभीर निष्काळजीपणा असल्याचे नगरसेवक वसीम खान यांनी म्हटले असून, रुग्णालय प्रशासनाने लेखी माफी मागावी तसेच जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या धार्मिक भावना व श्रद्धांचा आदर राखणे ही रुग्णालय प्रशासनाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.



## दरोडा टाकणाऱ्यांना पंजाबमधून बेड्या

■ नाशिक/वृत्तसंस्था

पंचवटी परिसरातील हिरवाडी येथील न्यू समृद्धी ज्वेलर्स येथे दरोड्याचा प्रयत्न करणाऱ्या ६ अज्ञातांपैकी २ जणांना नाशिक पोलिसांनी तब्बल 500 CCTV तपासून पंजाब येथून अटक केली आहे. नाशिकच्या हिरवाडी परिसरात असलेल्या न्यू समृद्धी ज्वेलर्स येथे १५ मे २०२६ रोजी सायंकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास ६ अज्ञातांनी शस्त्र दरोडा टाकला होता. दुकानातील महिला व्यावसायिक आणि कामगारांनी प्रतिकार केल्याने दरोडेखोरांचा हा प्रयत्न फसला होता. या घटनेत ज्वेलर्स दुकानातील एक कामगार हे जखमी देखील झाले होते. या प्रकरणी पंचवटी पोलिसांत दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता आणि पोलिसांकडून अज्ञात दरोडेखोरांचा शोध घेण्यास सुरुवात करण्यात आली. सुरुवातीला कुठलाही सुगावा लागत नसल्याने पोलिसांसमोर या दरोडेखोरांना पकडण्याचे मोठं आव्हान होतं. मात्र नाशिक शहर पोलीस गुन्हे शाखा १, २ आणि पंचवटी पोलिसांनी तब्बल ५०० सीसीटीव्ही तपासून त्याआधारे संशयतांचा सुगावा लावला आणि थेट पंजाब येथून या



गुन्ह्यातील दोघा संशयतांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. दरोडा टाकणाऱ्यांमध्ये १ संशयित हा पंजाबच्या मोहाल तर एक जण पटियाला येथील आहे. धक्कादायक बाब म्हणजे गुन्ह्यातील अटक केलेल्यांपैकी एक संशयित हा माजी सैनिक आहे. रणजीत सिंह असे त्याचे नाव आहे. अटक केलेले दोघे जण हे सराईत गुन्हेगार असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.दरोड्यामध्ये सहभागी असलेले आणि अटक केलेलं दोघे हे २०१० मध्ये अंबाला येथील जेलमध्ये होते. तिथेच त्यांची एकमेकांशी ओळख झाली आणि नंतर ते दोघे एकमेकांच्या संपर्कात होते. दोघांनी दरोड्याचा प्लॅन केला. त्यानंतर दोघे पंजाब येथून निघाले तेव्हाच त्यांनी त्यांचे मोबाईल हे बंद केले होते. पंजाबहून त्यांनी थेट मुंबई गाठले आणि मुंबईनंतर त्यांनी नाशिक गाठून येथे एक लॉजवरती ते वास्तव्यास होते.

## जांभळाच्या झाडावर दबा... अन् तासाभरात दोन हल्ले! बोरखिंडमध्ये बिबट्याचा थरार; हिमतीने वाचला जीव

■ सिन्नर/वृत्तसंस्था

सकाळची वेळ... घराजवळ शांतपणे जनावरांचा चारा कापण्याचे काम सुरू होते. अचानक दबक्या पावलांनी आलेल्या बिबट्याने पांडुरंग निरगुडे यांच्या मानगुटीवर झडप घातली आणि काही क्षणांतच सोनार खोरा परिसरात एकच खळबळ उडाली.जीव वाचवण्यासाठी निरगुडे यांनी उजव्या हाताने प्रतिकार केला आणि बिबट्याला परतवून लावले. मात्र, थरार इथेच थांबला नाही. पहिल्या हल्ल्यानंतर जांभळाच्या ५० ते ६० फूट उंच झाडावर जाऊन बसलेल्या बिबट्याने तासाभराने पुन्हा खाली उतरून दुसऱ्या तरुणावर झडप घातली.पांडुरंग लक्ष्मण निरगुडे (४०) हे सकाळी सातच्या सुमारास घराजवळील शेतात बसून जनावरांसाठी चारा कापत होते. त्याचवेळी अचानक बिबट्याने त्यांच्यावर हल्ला केला. क्षणाचाही विलंब न करता निरगुडे यांनी उजव्या हाताने बिबट्याला प्रतिकार केला. झटापटीत त्यांच्या हाताला गंभीर जखम झाली; मात्र त्यांनी प्रसंगावधान राखल्याने मोठा अनर्थ टळला.घटनेनंतर वन विभागाला माहिती देण्यात आली. वन विभागाचे कर्मचारी रामदास हरळे यांनी जखमी निरगुडे यांना तातडीने नाशिकरोड येथील बिटको रुग्णालयात दाखल केले. दरम्यान, हल्ल्यानंतर बिबट्या जवळील जांभळाच्या झाडावर जाऊन बसला होता. परिसरात भीतीचे वातावरण असतानाच निरगुडे यांचे भाचेजावई सुभाष कचरू फोडसे (वय २६) हे त्यांच्या घरी आले. अंगणात पोहोचताच झाडावर दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक खाली



उतरून त्यांच्यावरही झडप घातली. पाठीमागून पंजा मारल्याने फोडसे यांचा शर्ट फाटला. हल्ल्याने काही क्षण तेही गांगरले; मात्र त्यांनी धाडस दाखवत उजव्या हाताने बिबट्याला प्रतिकार केला. त्यानंतर बिबट्या जंगलाच्या दिशेने पसार झाला.सोनार खोरा परिसरात गेल्या काही दिवसांपासून तीन बिबट्यांचा वावर असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. सलग दोन हल्ल्यांनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांनी वन विभागाकडे तातडीने कारवाईची मागणी केली. सरपंच गणेश कर्मे यांच्या पुढाकाराने वन विभागाने घटनास्थळी तीन पिंजरे लावून बिबट्याला जेरबंद करण्यासाठी सापळा रचला आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी हर्षल पारेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

## पहाटे केबिनमध्ये झोपले; भरधाव ट्रक उलटून 3 मजूर दगावले, नागपूर हळहळलं

■ नागपूर/वृत्तसंस्था

नागपूर जिल्ह्यातील काटोल तालुक्यात पहाटेच्या सुमारास एक भीषण अपघात घडला असून विटांनी भरलेला आयशर ट्रक पलटी झाल्याने तीन मजुरांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला, तर अन्य तीन मजूर गंभीर जखमी झाले आहेत. ईसापूर गावाजवळ सावनेर मार्गावर हा अपघात घडल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. मृत आणि जखमी सर्व मजूर मोवाड येथील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, खापा येथून विटांनी भरलेला आयशर ट्रक मोवाडकडे निघाला होता. रात्री उशिरापर्यंत विटा भरण्याचे काम केल्यानंतर ट्रकमधील सहाही मजूर केबिनमध्ये गाढ झोपेत होते. पहाटे ईसापूर गावाजवळ ट्रक भरधाव वेगात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर ट्रक थेट रस्त्याखाली जाऊन उलटला. ट्रकमध्ये भरलेल्या विटांखाली मजूर दबले गेल्याने घटनास्थळीच तिघांचा मृत्यू झाला.या अपघातात



संजय कनेरे, लीलाधर वालूलकर आणि अजित भलावी यांचा जागीच मृत्यू झाला. तर राजेंद्र राजगुरू, हेमराज कन्हेरे आणि सुभाष धुर्वे हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जवळच्या सरकारी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले.

मोठ्या प्रमाणावर विटा रस्त्याखाली पसरल्याने बचावकार्य करताना अडचणी निर्माण झाल्या.दरम्यान, अपघातानंतर चालक आणि ट्रक मालक घटनास्थळावरून फरार झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. जखमींना मदत न करता चालकाने पळ काढला. या प्रकरणी प्रवीण उर्फ गोलू बले याच्याविरोधात काटोल पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून त्याचा शोध सुरू आहे. या प्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता तसेच मोटार वाहन कायद्यान्वये गंभीर कलमांखाली गुन्हा नोंदवला आहे. ट्रकचा वेग, चालकाची निष्काळजीपणा आणि वाहनाची स्थिती याबाबत तपास सुरू असून अपघाताचे नेमके कारण शोधले जात आहे.

# आरसीबीचा दिल्लीवर दणदणीत विजय!

# हेझलवूड-भुवनेश्वरसमोर दिल्लीने गुडघे टेकले

## कॅपिटल्स ७६ धावांवर ऑलआऊट



■ मुंबई, वृत्तसंस्था :

आरसीबी आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात दिल्लीतील अरूण जेटली स्टेडियममध्ये सामना खेळवण्यात आला. या सामन्यात आरसीबीने आपला दबदबा राखला आणि ८१ चेंडूत राखून दणदणीत विजय मिळवला. या सामन्यात आरसीबीच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी करत दिल्लीला अवघ्या ७६ धावांवर सर्वबाद केलं. गेल्या सामन्यात २६४ धावा आणि या सामन्यात दिल्लीचा संघ फक्त ७५ धावा करू शकला. यामागचं कारण म्हणजे जोश हेझलवूड आणि भुवनेश्वर कुमारची भेदक गोलंदाजी.

दिल्लीने दिलेल्या ७६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आरसीबीने अवघ्या ६.३ षटकांत सामना जिंकला. जेकब बेथल व विराट कोहलीच्या जोडीने डावाला सुरूवात केली. जेकब बेथलने या सामन्यात २ गगनचुंबी षटकार लगावत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. बेथल २० धावा करत काईल जेमिसनच्या गोलंदाजीवर बाद झाला. नटराजनने उत्कृष्ट झेल टिपत त्याला बाद केलं. यानंतर विराट कोहली व देवदत्त पडिक्कल यांनी संघाला विजय मिळवून दिला. आपल्या वादळी फॉर्मात असलेल्या पडिक्कलने अवघ्या १३ चेंडूत ३ चौकार व ३ षटकारांसह ३४ धावांची खेळी केली. तर विराट कोहलीने १५ चेंडूत १ चौकार व २ षटकारांसह २३ धावांची खेळी केली. या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी करत संघाचा विजय सोपा केला.

विराट कोहलीने या सामन्यात ११ धावा करताच मोठा टप्पा गाठला. विराटने आयपीएलमध्ये ९ हजार धावांचा पल्ला पार केला. विराट हा आयपीएलमध्ये ९ हजार धावा करणारा पहिला खेळाडू आहे.

आरसीबीने नाणेफेक जिंकत दिल्लीला गोलंदाजीसाठी पाचारण केलं. दिल्लीची सर्वात खराब सुरूवात झाल्याने संघ अवघ्या १०० धावाही करू शकला नाही. दिल्लीने ४ षटकांत ६ विकेट्स गमावल्या. भुवनेश्वर कुमारने पहिल्या षटकात साहिल पारखला क्लीन बोल्ड केलं. त्यानंतर जोश हेझलवूडने दुसऱ्या षटकात केएल राहुल व समीर रिझवी यांनी बाद करत माघारी धाडलं. यानंतर ट्रिस्टन स्टब्स व अक्षर पटेलला भुवनेश्वर कुमारने झेलबाद केलं. हेझलवुड व भुवनेश्वर कुमारने कसोटी क्रिकेटमधील लाईन लेंग्थसह दिल्लीची अवस्था बिकट केली. यासह पॉवरप्लेमध्ये दिल्लीची स्थिती ६ बाद १३ अशी होती.

डेव्हिड मिलर व अभिषेक पोरेल यांनी ३५ धावांची भागीदारी रचली होती. पण रसिख दर सलामने मिलरला झेलबाद करत संघाला मोठी विकेट मिळवून दिली. मिलर १९ धावा करत बाद झाला, यानंतर काईल जेमिसनने १२ धावांची खेळी केली. जेमिसनला कृणाल पंड्याने पायचीत केलं. यानंतर कुलदीप यादवला सुयश शर्माने क्लीन बोल्ड केलं. तर अभिषेक पोरेल ३३ चेंडूत ३ चौकारांसह ३० धावा केल्या. अभिषेक पोरेलला जोश हेझलवूडने १७व्या षटकात क्लीन बोल्ड केलं. यासह दिल्लीचा संघ फक्त ७५ धावांवर सर्वबाद झाला.

आरसीबीकडून या सामन्यात जोश हेझलवूडने ३.३ षटकांमध्ये १२ धावा देत ४ विकेट्स घेतल्या. तर भुवनेश्वर कुमारने ३ षटकांत फक्त ५ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. यादरम्यान भुवनेश्वरची इकॉनॉमी १.७० होती. याशिवाय सुयश शर्मा, कृणाल पंड्या, रसिख सलाम दर यांनी प्रत्येकी १-१ विकेट्स घेतल्या.

## भारताच्या गोलंदाजाचा तिरस्कार वाटतो, संधी मिळाली तर.., पाकिस्तानी खेळाडूचं विधान

■ मुंबई/वृत्तसंस्था

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील क्रिकेटच्या मैदानावरील द्वंद्व आपल्या सर्वांनाच माहित आहे. दोन्ही संघांमध्ये कायमच हायव्होल्टेज लढती पाहायला मिळाल्या आहेत. या दोन्ही संघांमधील ही स्पर्धा केवळ मैदानातील कामगिरीमुळेच नव्हे, तर खेळाडूंची वक्तव्ये, हावभाव आणि मैदानाबाहेरील वादांमुळेही अनेकदा ठळकपणे दिसून येते. अलीकडेच, युवा पाकिस्तानी खेळाडू हसन नवाझने भारतीय गोलंदाजांवर जहाल टीका केली, जी आता व्हायरल होत आहे.

पाकिस्तान सुपर लीग २०२६ दरम्यान भारतीय गोलंदाजांविरुद्ध बोलणाऱ्या पाकिस्तानी फलंदाज हसन नवाझचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये, एका स्थानिक वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत हसन नवाझला विचारण्यात आलं की, जगातील कोणत्या गोलंदाजाविरुद्ध त्याला सर्वाधिक धावा करायच्या आहेत. त्यावर उत्तर देताना त्याने भारताच्या गोलंदाजांचा उल्लेख केला.


हसन नवाझ उत्तरादाखल म्हणाला, “आम्ही नेहमी भारतीय संघाच्या गोलंदाजांविरुद्ध धावा करण्याचा विचार करतो. हे अगदी सोपं आहे, आम्हाला त्यांच्या प्रत्येक गोलंदाजाचा तिरस्कार वाटतो. देवाची इच्छा असेल आणि आम्हाला संधी मिळाली, तर भविष्यात आम्ही अधिकाधिक धावा करण्याचा नक्कीच प्रयत्न करू.” हसन नवाझने असंही म्हटलं की,




भारताविरुद्ध खेळताना त्याला स्वाभाविकपणे अधिक प्रेरणा मिळते. मात्र, आतापर्यंत त्याला भारतीय संघाविरुद्ध फार मोठी कामगिरी करता आलेली नाही. महत्त्वाचं म्हणजे हसन नवाझ भारताविरुद्ध फक्त एकच सामना खेळला आहे. त्या सामन्यात तो केवळ ५ धावांवर बाद झाला होता. हसन नवाझने २०२५ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलं. आतापर्यंत त्याने २५ टी-२० सामने खेळले असून, त्यात दोन अर्धशतकं आणि एका शतकासह २०.७७ च्या सरासरीने आणि १५४.३९ च्या स्ट्राइक रेटने ४५७ धावा केल्या आहेत. दरम्यान, पाकिस्तान सुपर लीग २०२६ मधील त्याची कामगिरी तुलनेने सामान्य राहिली आहे. हसनने १० सामन्यांमध्ये केवळ दोन अर्धशतकांसह फक्त २९१ धावा केल्या आहेत.

## रघुवंशीवर BCCIची कारवाई!

■ मुंबई/वृत्तसंस्था



लखनौ सुपर जायंट्स आणि कोलकाता नाईट रायडर्सच्या सामन्यात मोठा वाद पाहायला मिळाला. अंगक्रिश रघुवंशी ऑबस्ट्रक्टिंग द फिल्डमुळे बाद देण्यात आलं होतं. हे पाहून सर्वच जण अवाक् झाले, अंगक्रिश रघुवंशीदेखील पंचांशी हुज्जत घालत होता आणि अभिषेक नायरदेखील चौथ्या पंचांशी वाद घालताना दिसला. या सर्व प्रकरणानंतर अंगक्रिश रघुवंशी चर्चेत असताना त्याच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

पहिल्या डावातील पाचव्या षटकातील अखेरच्या चेंडूवर रघुवंशी हलक्या हाताने खेळलेल्या फटक्यानंतर धाव घेण्यासाठी धावू लागला. तितक्यात ग्रीनने त्याला पुन्हा क्रीजवर जाण्याचा इशारा केला. त्यानंतर मागे परतताना रघुवंशी वेगळ्या अँगलमध्ये धावला. ज्यामुळे स्टंपच्या दिशेने फेकलेला चेंडू त्याच्या शरीराला लागला. यामुळे मोहम्मद शमी व ऋषभ पंत यांनी ऑबस्ट्रक्टिंग द फिल्डसाठी अपील केलं. तिसऱ्या पंचांनी व्हीडिओ पाहिल्यानंतर तो चेंडूच्या मध्ये आल्याचं सांगत त्याला बाद दिलं.

अंगक्रिश रघुवंशी बाद दिल्यानंतर पंचांशी चर्चा करताना दिसला. पंचांनी त्याला समजावत मैदानाबाहेर जाण्यास सांगितलं. मैदानाबाहेर जात असताना रघुवंशीने रागात बॅट बाऊंड्री रोपवर मारली आणि हेल्मेट फेकून देत आपला संताप व्यक्त केला. याचाच फटका आता त्याला बसला आहे. आयपीएल निवेदनात म्हटलं आहे की, कोलकाता नाईट रायडर्सचा फलंदाज आणि यष्टिरक्षक अंगक्रिश रघुवंशी याच्यावर लखनऊ सुपर जायंट्सविरुद्धच्या सामन्यात (मॅच क्र. ३८) आयपीएल आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबद्दल कारवाई करण्यात आली आहे. त्याच्या सामन्याच्या मानधनातून २० टक्के दंड आकारण्यात आला असून त्याला एक डिमेरिट पॉइंटही देण्यात आला आहे.

## पहिल्यांदाच असं घडलं! दिल्ली कॅपिटल्सच्या नावे नकोसा रेकॉर्ड..



■ हैदराबाद/वृत्तसंस्था

आयपीएल २०२६ स्पर्धेत आतापर्यंत तरी फलंदाजांचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. दिल्ली कॅपिटल्सने याआधी पंजाब किंग्ज संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात २६४ धावांचा डोंगर उभारला होता. ही या हंगामातील सर्वोच्च धावसंख्या होती. तरीदेखील दिल्लीला पराभवाचा सामना करावा लागला होता. आता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात दिल्लीच्या फलंदाजांचा सुपर फ्लॉप शो पाहायला मिळाला आहे. यासह दिल्ली कॅपिटल्सच्या नावे नकोसा रेकॉर्ड नोंदवला गेला आहे.

अरुण जेटली स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सचा संपूर्ण डाव अवघ्या ७५ धावांवर आटोपला. यादरम्यान रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघातील गोलंदाजांनी दमदार गोलंदाजी केली. सुरुवात चांगली मिळाली की शेवट चांगला होतो. पण दिल्लीला हवी तशी सुरुवात करता आली नाही. पावरप्लेमध्ये फलंदाजी करताना दिल्लीचे अवघ्या १३ धावांवर ६ फलंदाज तंबूत परतले होते. ही आयपीएल स्पर्धेच्या इतिहासातील आतापर्यंतची सर्वात कमी धावसंख्या आहे. दिल्ली कॅपिटल्सचा संघ हा पावरप्लेमध्ये सर्वात कमी धावा करणारा संघ ठरला आहे. दिल्ली कॅपिटल्स एकापेक्षा एक स्फोटक फलंदाज आहेत. पण रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या धारदार गोलंदाजीसमोर सर्व फलंदाजांनी नांग्या टाकल्या. यासह १३ धावसंख्येवर ६ फलंदाज बाद होऊन माघारी परतले. तर याआधी पावरप्लेमध्ये सर्वात कमी धावा करण्याचा रेकॉर्ड हा राजस्थान रॉयल्स संघाच्या नावे होते. या संघाने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात ३ गडी बाद अवघ्या १४ धावा केल्या होत्या. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना दिल्ली कॅपिटल्सचा डाव अवघ्या ७५ धावांवर आटोपला. दिल्लीकडून अभिषेक पोरेलने सर्वाधिक ३० धावांची खेळी केली. तर उर्वरीत कुठल्याही फलंदाजाला हवी तशी कामगिरी करता आली नाही. या धावांचा पाठलाग करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने ८१ चेंडूं शिल्लक ठेवून सामना आपल्या नावावर केला.

# ऑस्करसाठी शॉर्टलिस्ट होमबाउंड वर चोरीचा आरोप

## चंगोइवाला खटला दाखल करण्याच्या तयारीत

**मुंबई :** भारताकडून ऑस्करसाठी दावेदार असलेल्या 'होमबाउंड' चित्रपटावर साहित्यिक चोरीचा मोठा आरोप लागला आहे. लेखिका आणि पत्रकार पूजा चंगोइवाला यांनी करण जोहरच्या धर्मा प्रॉडक्शन्स आणि नेटफ्लिक्स इंडियावर त्यांच्या २०२१ मध्ये आलेल्या 'होमबाउंड' पुस्तकातून चोरी केल्याचा खटला दाखल केला आहे.

पूजाचे म्हणणे आहे की चित्रपटाचे शीर्षक तिच्या पुस्तकासारखेच आहे. पुस्तकातील दृश्ये, संवाद, कथेची रचना आणि घटनांचा क्रम देखील कॉपी करण्यात आला आहे. दोन्ही कथा कोविड-१९ दरम्यान मजुरांच्या स्थलांतरावर आधारित आहेत. तिने १५ ऑक्टोबर रोजी कायदेशीर नोटीस पाठवली, परंतु निर्मात्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले.

पूजा मुंबई उच्च न्यायालयात खटला दाखल करण्याच्या तयारीत आहेत. त्या चित्रपटाच्या वितरणावर बंदी, कॉपी केलेला मजकूर काढून टाकणे, शीर्षक बदलणे आणि नुकसानभरपाईची मागणी करत आहेत. त्यांचे म्हणणे आहे



की, चित्रपटाची पटकथा २०२२ मध्ये तयार झाली, जी त्यांच्या पुस्तकानंतर एक वर्षाने आहे, हा योगायोग असू शकत नाही.

धर्मा प्रॉडक्शन्सने सांगितले की, हे प्रकरण कायदेशीर मार्गाने सोडवले जात आहे. या चित्रपटात ईशान खट्टर, विशाल जेठवा आणि जान्हवी कपूर आहेत. दिग्दर्शक नीरज घायवान यांचा हा चित्रपट ऑस्करच्या टॉप १५ मध्ये शॉर्टलिस्ट झाला आहे.

# बायकोच्या ट्रोलर्सना गौरव खन्नाचे उत्तर

## आम्ही दोघेही आमच्या आयुष्यात आनंदी

**नवी दिल्ली :** अलीकडेच बिग बॉस १९ चा विजेता गौरव खन्नाची पत्नी आकांक्षा चमोलाचा एक डान्स व्हिडिओ व्हायरल झाला होता. आकांक्षाला तिच्या डान्समुळे सोशल मीडियावर ट्रोलिंगचा सामना करावा लागला होता. आता गौरव आपल्या पत्नीच्या समर्थनार्थ पुढे आला आहे आणि ट्रोलर्सना उत्तर दिले आहे.

गौरव म्हणाला, 'मी सर्वप्रथम सगळ्यांना सांगू इच्छितो की आकांक्षा ज्या मुलींसोबत डान्स करत होती, त्या माझ्या पब्लिसिस्टच्या टीमच्या सदस्य होत्या.

बिग बॉस दरम्यान त्यांनी खूप मेहनत केली होती आणि ही त्यांची सक्सेस पार्टी होती. मला डान्स करायला जास्त आवडत नाही, म्हणून आकांक्षाने विचार केला की ती त्यांच्यासोबत साम ील होऊन आनंद घेईल.

गौरव पुढे म्हणतो, 'त्यापैकी अनेकांना हे देखील माहीत नाही की ती कोणासोबत नाचत होती. मी फक्त मागे उभा राहिलो आणि तिला आनंद घेऊ दिला, कारण शेवटी हा माझ्या संघाचा विजय होता. माझ्या अनुपस्थितीत त्यांनीच माझ्यासाठी खूप मेहनत केली होती आणि त्यांनाही आनंदी राहण्याचा हक्क आहे.

ट्रोलर्सबद्दल बोलायचं झालं तर, मला त्यांच्यामुळे काही



फरक पडत नाही कारण मला माहीत आहे की ते कोणाचे तरी चाहते आहेत. त्यांचाही काहीतरी उद्देश असतो ज्यामुळे कोणालातरी कमी लेखता येईल. मी आणि आकांक्षा आमच्या आयुष्यात खूप आनंदी आहोत.'

गौरव आणि आकांक्षा एका पार्टीत सहभागी झाले होते. जिथे आकांक्षा पबमध्ये प्रवेश करण्यापूर्वीच काही मुलींसोबत डान्स करते. आकांक्षा डान्स करत असताना, गौरव बाजूला उभा राहून पाहतो. नंतर पुढे जाऊन म्हणतो की, आधी प्रवेश तर करा. सोशल मीडियावर व्हिडिओ समोर आल्यानंतर काही युजर्सना आकांक्षाचे डान्स मूव्हस आवडले नाहीत. त्यांच्या म ते ते अपमानकारक होते, त्यानंतर लोकांनी आकांक्षाला ट्रोल करायला सुरुवात केली होती.

# ॲनिमल चित्रपट आता जपानमध्ये होणार रिलीज

**मुंबई :** रणबीर कपूरचा सुपरहिट चित्रपट 'ॲनिमल' आता आंतरराष्ट्रीय स्तरावर नवा इतिहास रचत आहे. भारतात प्रचंड यश मि ळवल्यानंतर आता या चित्रपटाची क्रेझ जपानमध्येही पाहायला मिळत आहे. रणबीर कपूर, रश्मिका मंदान्ना आणि बॉबी देओल स्टारर 'ॲनिमल' चित्रपट आता जपानमध्ये रिलीज होणार आहे. भारतातील त्यांच्या प्रचंड यशानंतर आता सातासमुद्रापार चित्रपट रिलीज होण्यासाठी सज्ज होत आहे. भारतात हा चित्रपट रिलीज होऊन २ वर्ष झाली आहेत. आता दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा हा चित्रपट दुसऱ्या देशात रिलीज करण्यास सज्ज आहेत.

रणबीर कपूर अभिनीत 'ॲनिमल' चित्रपटाने भारतात प्रचंड यश मिळवल्यानंतर आता आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपली छाप पाडण्यास सुरुवात केली आहे. निर्मात्यांनी केलेल्या खास घोषणेनुसार हा चित्रपट आता जपानमध्येही रिलीज होणार असून, यामुळे भारतीय सिनेमाच्या जागतिक प्रवासाला नवी दिशा मिळाल्याचे पाहायला मिळत आहे.

ॲनिमल' या चित्रपट रिलीज होताच प्रेक्षकांनी लक्ष वेधून घेतले होते. चित्रपटातील दमदार कथा, जबरदस्त ॲक्शन, भावनिक नातेसंबंध आणि रणबीर कपूरचा प्रभावी अभिनय यामुळे हा सिनेमा मोठ्या प्रमाणावर पसंतीस उतरला होता. भारतासह अनेक परदेशी बाजारातही या चित्रपटाने चांगली कमाई केली आहे.

ॲनिमल चित्रपटाला २ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगा यांनी रणबीर कपूरचा एक फोटो शेअर केला. त्यामध्ये कॅप्शन लिहिले होते,



'ॲनिमलला दोन वर्षे'. अनिल कपूरने चित्रपटातील अनेक व्हिडिओ तसेच पडद्यामागील काही फोटो देखील शेअर केले होते. या फोटोमध्ये संदीप रेड्डी वांगा रणबीरला शॉट्स समजावून सांगताना दिसले.



# बांगलादेशमध्ये हिंदू युवकाची हत्या, जान्हवी कपूर संतापली

**पुणे :** बांगलादेशमध्ये हिंदूंच्या हत्येमुळे सगळेच संतापले आहेत. अनेक जण सोशल मीडियावर राग व्यक्त करत आहेत. इतर देशांना नेहमी पाठिंबा देणारे बॉलिवूड सेलिब्रिटी आज बांग्लादेशमधील हिंदूंच्या हत्येवर गप्प का अशी अनेकदा सोशल मीडियावर नेटकऱ्यांकडून तक्रार येत असते. दरम्यान अभिनेत्री जान्हवी कपूर पुढे आली आहे. तिने स्टोरी शेअर करत घटनेचा निषेध केला आहे.

जान्हवी काय म्हणाली वाचा

१८ डिसेंबर रोजी बांग्लादेश मध्ये हिंदू युवक दीपू चंद्र दासची क्रूर हत्या झाली. भारतातूनही या घटनेचा निषेध दर्शवला होता. आता अभिनेत्री जान्हवी कपूरने स्टोरी शेअर करत राग व्यक्त केला आहे. तिने लिहिले,'बांग्लादेशमध्ये जे घडतंय ते अत्यंत क्रूर आहे. हा नरसंहार आहे आणि हे काही पहिल्यांदा घडलेलं नाही. जर तुम्हाला या अमानवी सार्वजनिक हत्येविषयी माहित नसेल तर वाचा, व्हिडिओ पाहा आणि प्रश्न विचारा. आणि एवढं करुनही तुमच्या मनात संताप निम र्ण झाला नाही तर एक दिवस हाच ढोंगीपणा आपल्या सर्वांना नष्ट करेल.'

ती पुढे लिहिते, 'जगात दुसऱ्या कोपऱ्यात घडणाऱ्या घटनांवर आपण अश्रू गाळत असू तेव्हा आपल्याच भाऊ बहिणींना जिवंत जाळलं जाईल. माणूसकीचा विसर पडण्याच्या आत प्रत्येकाने कोणत्याही स्वरुपातील अतिरेकीपणाचा निषेध केला पाहिजे.

आपण केवळ एक प्यादे आहोत जे अदृश्य रेषेच्या आर किंवा पार उभे आहोत. हे ओळखा आणि निष्पाप लोकांना मारलं जात आहे त्यांच्यासाठी उभे राहा.' जान्हवी कपूरशिवाय याआधी रवीना टंडन, दीया मिर्झा, मुनव्वर फारुकी यांनी सुद्धा बांग्लादेशमध्ये होणाऱ्या हिंदूंच्या हत्येवर आक्रोश व्यक्त केला. रिपोर्टनुसार, बांग्लादेशमधील मैमनसिंहच्या भालुका तालिक्यात एक हिंदी कपडा फॅक्टरी मजूर दीपू चंद्र दासला जमावाने मारहाण केी आणि फासावर लटकवून जिवंत जाळलं. या हत्येमध्ये सहभागी असणाऱ्या अनेकांना नंतर अटक करण्यात आली.

# अल निनोच्या पार्श्वभूमीवर खरीप हंगामासाठी कृषी विभागाच्या मार्गदर्शक सूचना

**जनसंचलन बुलढाणा**

यंदाच्या खरीप हंगामात अल निनो ( ) चा प्रभाव वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली असून संभाव्य दुष्काळजन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना विविध उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत. पिकांचे नुकसान टाळणे, उत्पादन खर्च कमी करणे आणि शाश्वत उत्पन्न सुनिश्चित करणे हा या मार्गदर्शक सूचनांचा उद्देश आहे. कृषी विभागाने शेतकऱ्यांना पेरणीपूर्वी घरचे सोयाबीन बियाणे वापरण्याचा सल्ला दिला असून पेरणीपूर्वी उगवण क्षमता चाचणी ( ) करण्याचे आवाहन केले आहे. तसेच जमिनीत किमान ८० ते १०० मिमी पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. पेरणीदरम्यान ट्रायकोडर्मा, रायझोबियम, पीएसबी, ॲझोटोबॅक्टर किंवा लिक्विड कन्सॉर्शिया यांसारख्या जैविक घटकांद्वारे बीजप्रक्रिया करावी. यामुळे रासायनिक खतांचा खर्च कमी होऊन उत्पादन वाढण्यास मदत होते. सोयाबीन क्षेत्र अधिक असल्याने बीबीएफ ( ) अर्थात रुंद वरंबा-सरी पद्धतीने किंवा बेडवर टोकन पद्धतीने पेरणी करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. या पद्धतीमुळे कमी किंवा जास्त पावसातही पिकांचे नुकसान कमी होते. रासायनिक खतांचा अतिरेक टाळून मृदा आरोग्य पत्रिकेनुसार संतुलित खत व्यवस्थापन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळे उत्पादन खर्चात बचत होण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील सुमारे २३ हजार हेक्टरवरील फळबागांचे संरक्षण करण्यासाठी ठिबक व तुषार सिंचन, जैविक आच्छादन () आणि शेततळ्याद्वारे संरक्षित सिंचनाचा वापर करण्याचा सल्ला कृषी विभागाने दिला आहे. या उपाययोजनांसाठी शासनाच्या विविध योजनाही उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले. डिजिटल शेतीला प्रोत्साहन देताना कृषी विभागाने ङ्गमहाविस्तार ॲपफ डाउनलोड करण्याचे आवाहन केले आहे. जिल्ह्यात आतापर्यंत १ लाख ३४ हजार शेतकऱ्यांनी हे ॲप डाउनलोड केले असून याच्या माध्यमातून हवामान, पिक व्यवस्थापन आणि विविध योजनांची माहिती उपलब्ध होत आहे. तसेच ॲग्री स्टॅक अंतर्गत फार्मर आयडी काढणे अनिवार्य असल्याचे सांगण्यात आले आहे. जिल्ह्यातील ८५ टक्के शेतकऱ्यांनी फार्मर आयडी तयार केला असून उर्वरित शेतकऱ्यांनी सहाय्यक कृषी अधिकारी किंवा ग्राम महसूल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तात्काळ नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. कृषी विभागाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या हवामान व पीक सल्ल्याचा वापर करून पिकांचे वेळेत संरक्षण करावे, असेही विभागाने नमूद केले आहे. दरम्यान, पाणी फाउंडेशन आणि कृषी विभागामार्फत सुरू करण्यात येणाऱ्या ङ्गफार्मर कपफ स्पर्धेत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, तसेच गावपातळीवरील विविध कृषी मोहिमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. योग्य नियोजन आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर हीच अल निनोवर मात करण्याची गुरुकिल्ली आहे,फफ असे कृषी विभागाने म्हटले असून अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी गावातील कृषी सहाय्यक अथवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पाणी टंचाई निवारणार्थ सिंदखेड राजा तालुक्यातील नागझरी गावासाठी टँकर मंजूर

**जनसंचलन/बुलढाणा**

पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता सिंदखेड राजा तालुक्यातील नागझरी गावासाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. आदेशात ठरवून दिल्याप्रमाणे नियमित टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी यांनी दिली. नागझरी येथे २५० पशुधन व १०५० लोकसंख्येसाठी एक टँकरद्वारे १६ हजार ३६० लिटर्स पाणी पुरवठा दररोज करणार आहेत. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी, सिंदखेड राजा यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.




# आयुष्यमान कार्ड व वय वंदना कार्ड ई-केवायसी मोहिमेसाठी बुलढाणा जिल्हा प्रशासन सज्ज....

## २० मे ते ३० जून २०२६ या कालावधीत जिल्ह्यात विशेष मोहीम कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहू नये म्हणून ग्रामपातळीवर नियोजन

**जनसंचलन/बुलढाणा**

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना (-) अंतर्गत जिल्ह्यात १०० टक्के पात्र लाभार्थ्यांचे आयुष्यमान कार्ड आणि वय वंदना कार्ड ई-केवायसी (-) पूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य व पंचायत विभागाची संयुक्त आढावा बैठक संपन्न झाली. जिल्ह्यात २० मे ते ३० जून २०२६ या कालावधीत ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी सर्व संबंधित यंत्रणांना समन्वयाने काम करत मोहीम युद्धपातळीवर राबविण्याचे निर्देश दिले. जिल्ह्यातील कोणताही पात्र लाभार्थी या सुविधेपासून वंचित राहणार नाही, याची सक्त काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. ही मोहीम अधिक सुटसुटीत आणि प्रभावी व्हावी यासाठी त्याची विभागणी दोन टप्प्यांत करण्यात आली आहे. पहिला टप्पा २५ मे ते ४ जून २०२६ या कालावधीत प्रत्येक तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत () येणाऱ्या ५० टक्के ग्रामपंचायतींमध्ये विशेष शिबिरे होतील. यासोबतच सर्व ५० प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि २८२ उपकेंद्र स्तरावर शिबिरांचे आयोजन केले जाईल. तालुका फिल्ड टीममार्फत दररोज या कामाचे क्षेत्रीय सुपरव्हिजन केले जाईल. दुसरा टप्पा १० जून ते २० जून २०२६ या काळात उर्वरित ५० टक्के ग्रामपंचायतींमध्ये शिबिरे घेतली जातील. तसेच पहिल्या टप्प्यात सुटलेल्या किंवा प्रलंबित राहिलेल्या लाभार्थ्यांचा पाठपुरावा (-) करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र स्तरावर पुन्हा शिबिरे आयोजित केली जातील.

ग्रामपातळीवर विशेष शिबिरे व दुर्गम भागासाठी विशेष व्यवस्था : नागरिकांच्या सोयीसाठी ग्रामपंचायत कार्यालय, सीएससी () केंद्र, उपकेंद्र, शाळा परिसर आणि अंगणवाडी केंद्रांची निवड शिबिरांसाठी करण्यात आली आहे. या मोहिमेत आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी, ग्रामसेवक आणि स्वस्त धान्य दुकानदार यांचा सक्रिय सहभाग निश्चित करण्यात आला आहे. हे सर्व कर्मचारी लाभार्थ्यांना वेळेत माहिती देऊन शिबिरात उपस्थित राहण्यासाठी प्रवृत्त करतील. दुर्गम तसेच आदिवासी भागातील नागरिकांसाठी इंटरनेटची अडचण भासू नये, म्हणून ऑफलाइन सुविधा तसेच व्ही-सॅट () किंवा जिओ हॉटस्पॉट ( ) द्वारे पर्यायी इंटरनेट व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. या भागांना तालुका फिल्ड सुपरव्हिजन टीम प्राधान्याने भेट देणार आहे. या विशेष शिबिरांचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी येताना सोबत आधार कार्ड, रेशन कार्ड, आधारशी संलग्न असलेला मोबाईल क्रमांक आणणे आवश्यक आहे. ज्या नागरिकांचा मोबाईल क्रमांक आधार कार्डशी जोडलेला नसेल, त्यांनी तो जवळच्या सीएससी () केंद्रावर जाऊन तात्काळ अपडेट करून घ्यावा. जिल्ह्यातील सर्व पात्र नागरिकांनी या विशेष मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन आपले आयुष्यमान कार्ड आणि वय वंदना कार्ड ई-केवायसी तात्काळ पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# शरद पवारांची भेट, पार्थ पवारांच्या तक्रारीची आणि नाराजीची चर्चा...

मुंबई

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी गेल्या काही दिवसांपासूनच्या सर्व घडामोडींवर सविस्तर भूमिका मांडली. सुनील तटकरे यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली होती. या भेटीमुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आली होती. सुनील तटकरे हे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नाराज असल्याच्या देखील चर्चा समोर आल्या होत्या. अखेर या सर्व चर्चांवर सुनील तटकरे यांनी आपली अधिकृत भूमिका मांडली. शरद पवार यांना खोकल्याचा आणि दम्याचा त्रास झाल्यानंतर त्यांना वारंवार ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यामुळे शरद पवार यांना भेटावं अशी इच्छा होती. यामुळे शरद पवार यांची भेट मिळावी म्हणून इच्छा व्यक्त केली होती. मधल्या कालावधीत वेळ मिळाला तेव्हा मी दौऱ्यावर होतो आणि मी मुंबईत होतो तेव्हा शरद पवार दौऱ्यावर होते, अशी माहिती सुनील तटकरे यांनी दिली. नेमकं नवनिर्वाचित उपमुख्यमंत्र्यांची शपथ घेतल्यानंतर मुंबईला परतल्यावर शरद पवारांकडून निरोप आला की, दुसऱ्या दिवशी मी असेल तर भेट होऊ शकते. पण दुसऱ्या दिवशी माझ्या मतदारसंघात मंत्री नितेश राणे यांचे कार्यक्रम होते. संध्याकाळी पनवेलमध्ये अमृत महोत्सवचा कार्यक्रम होता. त्यानंतर त्यादिवशी मला विचारण्यात आलं की, आज वेळ आहे का? म्हणून मी शरद पवार यांना भेटायला गेलो. दहा मिनिटे त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. त्यावेळी कोणतीही राजकीय चर्चा झालेली नाही. होण्याचं काही कारण उद्भवतच नाही, असं सुनील तटकरे यांनी स्पष्ट केली. शरद पवारांची प्रकृती आणि आम्ही सबंध जे काही फिरतो त्याबद्दल चर्चा झाली. याबद्दल आमच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात कोणती चर्चा होण्याचं कारण नाही. शरद पवार हे ज्येष्ठ नेते आहेत. त्यांचे सर्वपक्षीय नेत्यांसोबत चांगले संबंध आहेत. मी सुद्धा स्वत:ला एका शिस्तीत बाळगणारा कार्यकर्ता आहे. प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा अध्यक्ष म्हणून काम करतो. अशावेळेला कोणतीही चर्चा झाली. त्यामुळे कुणाबद्दल तक्रार करणं हा विषयच उद्भवत नाही असं तटकरे यांनी स्पष्ट केलं. शरद पवारांनी कुणाला काय सल्ला द्यावा हा अधिकार त्यांनी सहा दशकांच्या कामांमधून वडिलकीच्या नात्यातून मिळवणार. मी १९८७-८८ पासून शरद पवार यांच्यासोबत काम करत आहे. माझ्या कामांची माहिती असल्यामुळे शरद पवारांनी मोठ्या मनाने ते वक्तव्य केलेलं असेल, अशी भूमिका सुनील तटकरे यांनी मांडली. पार्थ पवार यांच्याबद्दल तक्रारीचं काय कारण आहे? एकतर पार्थ पवार आणि जय पवार हे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी अकाली निधनानंतर सक्रीय राजकारणात सहभागी आहेत. पूर्वी ते राजकारण होते का? तर होते. पण सक्रीय होणं, जसं मी १९७७-७८ पासून पुलिंग एजंट, बुथ एजंट म्हणून काम केलं. पण १९८४ ला माझ्या वडिलांचं निधन झालं, मग मी तालुका काँग्रेसचा सरचिटणीस झालो, तालुका काँग्रेसचा अध्यक्ष झालो, जिल्ह्याचा झालो. तसं आता अजित दादांच्या अकाली निधनानंतर पार्थ असतील किंवा जय असतील हे सक्रीय राजकारणत आहेत. हे तरुण नेतृत्व आहेत. त्यांच्याबद्दल तक्रार असण्याचं कारणच काय?, असं सुनील तटकरे म्हणाले. उलट अजित दादांसोबत आम्ही दीर्घ काळ राजकीय प्रवास केला असल्यामुळे योग्यवेळेला योग्य मार्गदर्शन, त्यांची काय भूमिका असेल ते, आम्हाला काय वाटतं ते आम्ही समजून घेऊन पक्षांतर्गत वाटचाल करत असतो. आम्हाला आता पक्षाच्या पुढच्या २५ वर्षांची वाटचाल करायची आहे. पुढच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, आणि संघटना वाढवायची असेल तर काय कामे केली पाहिजेत याची चर्चा मी वारंवार करत असतोङ्घ, असं तटकरे म्हणाले. निवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्रावर काय म्हणाले? ङ्घनिवडणूक आयोगाला पाठवलेल्या पत्राच्या विषयावर आम्ही पक्षांतर्गत चर्चा केलेली आहे. तो विषय पूर्णपणाने संपुष्टात आलेला आहे. एकमताने, एक ताकदीने आम्ही सर्वजण काही कालावधीत महाराष्ट्रव्यापी दौरा सुरु करु आणि संघटनेच्या पुनर्बांधणीला वेग देऊ. पुनर्बांधणी शब्द का बोललो तर अजित दादा असेपर्यंत एक बांधणीचा ढाचा ठरलेला होता. दादांच्या दुर्दैवी अकाली निधननंतर सगळीच राजकीय समीकरणं बदलली. प्रशासकीय पातळीवर बदलली, एनडीएमध्ये बदलली, पक्षांतर्गत बदलली, वेगवेगळ्या क्षेत्रात बदलली, कारण एकखांबी नेतृत्वाकडे आम्ही काम करत आलो होता अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.





# चारपानी पत्र लिहून ३३ वर्षीय बँक कर्मचारी बेपत्ता, चिठ्ठीत चौघांची नावं; धरणाजवळ दुचाकी सापडल्याने धाकधूक

रत्नागिरी

रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूण तालुक्यात धक्कादायक घटना घडली आहे. बँक कर्मचारी असलेल्या ३३ वर्षीय युवकाने पोलिसांसाठी चार पानांचे पत्र लिहून तो बेपत्ता झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे. मुकुंद मुरलीधर पालांडे असे बेपत्ता झालेल्या बँक कर्मचाऱ्याचे नाव असून तो बेपत्ता असल्याची तक्रार त्याच्या वडिलांकडून पोलीस ठाण्यात देण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एका खासगी बँकेच्या चिपळूण शाखेत कार्यरत असलेल्या हा युवक शुक्रवारी दुपारी तीन वाजल्यापासून बेपत्ता झाल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. चिपळूण तालुक्यातील आलोरे गावचा रहिवासी असलेल्या मुकुंद याने चिपळूण पोलीस निरीक्षकांना माहिती देण्यासाठी एक चार पानी पत्र लिहिले आहे. त्यामध्ये काही नावांचाही समावेश आहे, त्यामध्ये चार जणांच्या नावाचा समावेश असून या चार जणांना त्याने आपल्या आत्महत्येस जबाबदार धरल्याची प्राथमिक माहिती पुढे आली आहे. चिपळूण शहरातील वीरेश्वर तलाव परिसरात आपल्याला चार जणांनी मारहाण केल्याचा उल्लेख करत ओळखीच्या पोलिसांच्या मध्यस्थीने हे प्रकरण मिटविण्यात आले, असाही उल्लेख करण्यात आला आहे. आपल्याला ब्लॅकमेलिंगच्या मानसिक त्रासामुळे आपण हे टोकाचे पाऊल उचलत असल्याचा उल्लेख तरुणाने या पत्रात केला आहे. शुक्रवारी रात्री उशिरा कोळकेवाडी धरण परिसरात बेपत्ता झालेल्या मुकुंद यांची दुचाकी आढळून आली आहे. शुक्रवारी रात्रीही तात्काळ शोधमोहीम राबवण्यात आली. शनिवारी सकाळपासून पुन्हा पोलिसांनी या सगळ्या प्रकरणाची गंभीर दखल घेत शिरगाव पोलिस निरीक्षक भरत पाटील यांच्या पथकाने शोधकार्य बोटीच्या सहाय्याने सुरू केलं आहे. मुकुंद पालांडे यांचा शोध घेण्यात अद्याप पोलिसांना यश आलं नसून चिपळूणचे पोलीस निरीक्षक श्री. नेमाडे यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरात शोधमोहीम सुरू आहे.





दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८